**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २३ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून तरूणांना सक्षम बनवण्याला केंद्र सरकार महत्व देत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन; नागपूरातील रोजगार मेळ्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान.**
2. **परभणीतील आंदोलक सोमनाथ सुर्यवंशींची हत्याच, जबाबदार पोलिसांना कठोर शिक्षा व्हावी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची मागणी.**
3. **केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमान तळावरील रनवेच्या रिकारपेटिंगची केली पाहणी, प्रलंबित काम तातडीने पूर्ण करण्याचे दिले निर्देश.**
4. **विदर्भात थंडी परतली, किमान तापमानात पुन्हा घट, गोंदियात पारा १४ अंशावर.**

रोजगार मेळावा -पंतप्रधान

तरूणांच्या क्षमता आणि कलागुणांचा पूरेपूर वापर करून या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून तरूणांना सक्षम बनवण्याला केंद्र सरकार प्राधान्य देत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून रोजगार मेळाव्याला संबोधित करत होते. देशभरात ४५ ठिकाणी असे रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले असून गृह मंत्रालय, टपाल कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारख्या विविध मंत्रालयांमध्ये ७१ हजारांहून अधिक नियुक्तीपत्राचं वाटप करण्यात आलं. 'मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत अभियान, स्टार्टअप इंडिया, स्टँड अप इंडिया, डिजिटल इंडियासारख्या योजनाही युवांना केंद्रस्थानी ठेवून बनवण्यात आल्या असल्याचं पंतप्रधानांनी यावेळी सांगितलं. या रोजगार धोरणांमुळं ग्रामीण भागांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत असल्याचंही ते यावेळी म्हणाले.

रोजगार मेळा -नागपूर

आयुष्यामध्ये प्रामाणिकपणा, विश्वसनीयता आणि पारदर्शकता ह्या क्षमता आहेत. शासकीय नोकऱ्यांमध्ये नवनियुक्तांनी आपल्या अंगभूत तसेच व्यक्तिगत कौशल्याचा विकास करून केवळ नोकरी मागणारे नव्हे तर नोकरी देणारे व्हावे असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरच्या केंद्रीय राखीव पोलीस दल ग्रुप सेंटर हिंगणा येथे आयोजित रोजगार मेळाव्यात केले. या मेळाव्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केले. सुमारे 257 जणांना नागपूर मधील रोजगार मेळाव्यात गडकरींच्या हस्ते नियुक्तीपत्र वितरित करण्यात आले. हा रोजगार मेळावा देशभरात ४५ ठिकाणी आयोजित करण्यात आला असून, या माध्यमातून देशभरातून निवडलेले नवे उमेदवार गृह मंत्रालय, टपाल कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारखी विविध मंत्रालयं तसंच विभागांमध्ये नियुक्त झाले. यावेळी नियुक्ती पत्र मिळाल्या नंतर नव नियुक्तांनी आनंद व्यक्त केला ----

***माझं नाव कीर्ती बाळकृष्ण बुधे आहे, मी भंडारा ची निवासी आहे. माझं सिलेक्शन CISF डिपार्टमेंट ला झालेलं आहे. आज माननीय प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते मला नियुक्तीपत्र मिळालेलं आहे, मी त्यांची भरपूर आभारी आहे. मी माझं आपल्या देशासाठी बेस्ट देणार जय हिंद.***

आणखी एका नव नियुक्ताने आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की ----

***नाम प्रतीक्षा पारधी है. मुझे ITBP के तरफ से कॉल लेटर आया है । देश की सेवा करने का एक हमेशा से मेरा शौक रहा है, और आज मै बहुत खुश हु, कि प्रधानमंत्री साहब के तरफ से मुझे ये जॉइनिंग लेटर मिला है, उनका बहोत बहोत धन्यवाद ।***

शेतकरी दिन

माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंग यांची जयंती आज राष्ट्रीय शेतकरी दिन म्हणून साजरी होत आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी दिल्लीत किसान घाट या चौधरी चरण सिंग यांच्या समाधीवर आदरांजली अर्पण केली. राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. देशाच्या अन्नसुरक्षा आणि समृद्धीमध्ये शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या योगदानाचा सन्मान

करण्याचा हा दिवस आहे. खाद्य सुरक्षा सुनिश्चित करणं, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करणं आणि देशाच्या कृषी वारश्याच्या संरक्षणात शेतकऱ्यांच्या अमूल्य भूमिकेचं स्मरण यानिमित्त केलं जातं.

राष्ट्रीय ग्राहक दिन

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त, उद्या २४ डिसेंबरला ग्राहक व्यवहार विभाग, जागो ग्राहक ॲप, जागृती ॲप आणि जागृती डॅशबोर्ट लॉन्च करणार आहे. या ॲपमुळे फसवणुकीच्या प्रकरणाविरोधात कारवाई करणं केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधीकरणाला शक्य होणार आहे. जागो ग्राहक ॲपमुळे ग्राहकांना URLची माहिती मिळणं शक्य होईल, तसंच यातून काही धोका असल्यास ग्राहकाला सावधानतेचा इशारा दिला जाणार आहे. जागृती ऍपमुळे ग्राहकांना URL ची तक्रार करता येणार आहे.

राहुल गांधी

परभणीतील तरुण, सोमनाथ सुर्यवंशी हा संविधानाचे रक्षण करणारा होता. हा पोलीस कोठडीतील मृत्यू असून सोमनाथ सुर्यवंशी यांच्या हत्येला जबाबदार असणाऱ्यांना लवकरात लवकर कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज परभणी इथं सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. परभणीतील घटनेची सर्व माहिती जाणून घेतली व कुटुंबाला धीर दिला. यावेळी राहुल गांधी यांच्याबरोबर महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, आ. विजय वडेट्टीवार, डॉ.नितीन राऊत, आ. अमित देशमुख, यशोमती ठाकूरआदि उपस्थित होते. सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांची भेट घेतल्यानंतर राहुल गांधी यांनी आंबेडकरी कार्यकर्ते विजय वाकोडे यांच्या कुटुंबाचीही भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. परभणी आणि बीड प्रकरणी मुख्यमंत्र्यांविरोधात विशेषाधिकार प्रस्ताव आणू. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी हत्याप्रकरण दडपण्याचे प्रयत्न सरकार करत आहे. सुर्यवंशी यांचा मृत्यू दम्याच्या आजाराने झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितले पण आम्ही वस्तुस्थिती जाणून घेतली आहे, सोमनाथ सुर्यवंशींचा मृत्यू पोलीस मारहाणीमुळे झाल्याचे पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये सांगण्यात आलं आहे.

रनवेचा रि कारपेटिंग

नागपुरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नवीन धावपट्टीच्या कामाला वेळ लागत असल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्याचवेळी एक महिन्याच्या आत हे काम पूर्ण करा, अन्यथा कारवाई करण्यात येईल, असा ‘इशारा  गडकरी यांनी संबंधित कंपनीला दिला.डिसेंबर २०२३ मध्ये विमानतळ प्राधिकरणाने धावपट्टीच्या कारपेटिंगची निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर १ मे २०२४ ला के. जी. गुप्ता कंपनीला या कामाचे कार्यादेश देण्यात आले. मात्र, अद्याप धावपट्टीचे काम पूर्ण झालेले नाही. यासंदर्भात अनेक तक्रारी  गडकरी यांना प्राप्त झाल्या होत्या. शिवाय, धावपट्टीच्या कामामुळे सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत नागपूर विमातळावरील आवागमन बंद ठेवण्यात आले आहे. त्यामुळे विमानांच्या तिकिटांचे दरही दुप्पट-तिप्पट प्रमाणात वाढलेले आहेत. नियमित विमान प्रवास करणाऱ्यांना याचा त्रास होत आहे. याची दखल घेत  नितीन गडकरी यांनी धावपट्टीच्या कामाची आज  पाहणी केली.

चंद्रशेखर बावनकुळे

जनतेला त्रासदायक ठरलेल्या महाराष्ट्रातील वाळू माफियागिरीला पायबंद घालण्यासाठी सरकार विशेष लक्ष देईल. वाळू विषयक सुलभ धोरण आणू." अशी घोषणा राज्याचे महसूल मंत्री चन्द्रशेखर बावनकुळे यांनी केली.  जनतेला वाळू सहज उपलब्ध होईल असे सुलभ धोरण देशातील कोणत्या राज्यात आहे, त्यासंदर्भात अभ्यास करून महाराष्ट्रात वाळूविषयक सुलभ धोरण अस्तित्वात आणू.असं ते म्हणाले. याशिवाय "राज्यात सुमारे 86 हजार हेक्टर झुडपी जंगल जमिनींचा प्रश्न प्रलंबित असून, यामुळे अनेक विकास प्रकल्प रखडले आहेत. या जमिनी प्रामुख्याने विदर्भात अधिक असून, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात खटला चालू आहे. याखटल्याच्या बाबतीत न्यायालयात पाठपुरावा करून, हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू असं आश्वासन तिन्ही दिलं.

क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात ७ डिसेंबर ते २७ मार्च २०२५ या कालावधीत जागतिक क्षयरोग दिनापर्यंत १०० दिवसांची क्षयरोग शोधमोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत अधिकाधिक क्षयरुग्ण शोधून त्यांना उपचाराअंतर्गत आणणे, क्षयरुग्णांचा मृत्युदर कमी करणे आदी उद्दिष्टे ठेवण्यात आली आहेत. या मोहिमेमुळे 'टीबी' हरणार अन् देश जिंकणार असल्याचे दिसून येत आहे. १०० दिवसांची टीबी मोहीम देशातील निवडक ३४७ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. त्यामध्ये भंडारा जिल्ह्याचाही समावेश आहे. या क्षयरोग शोधमोहीमेबाबत अधिक माहिती देत आहेत भंडारा जिल्हा परिषदेचे आरोग्य अधिकारी डॉ.मिलिंद शामकुवर

***आपल्या आशा वर्कर आहेत, आरोग्य कर्मचारी, CHO हे घरोघरी जाऊन त्यांची तपासणी करणार त्यांच्या संशयितांना टी.बी. लक्षण आढळतील त्यांची आपण तपासणी करून घेणार आहोत. Nikshay व्हॅनच्या मदतीने हे निक्षय वाहन जे आहेत याच्यामध्ये थुंकी नमुना तपासण्याची TrueNAAT मशीन अद्ययावत राहणार आहे आणि सोबत पोर्टेबल एक्स-रे पण राहणार आहेत. त्यांच्या छातीचे एक्सरे आणि थुंकीची तपासणी आपण या संशयित क्षयरोगांची करून घेणार आहोत आणि त्याच्यातून जास्तीत जास्त ज्यांना टी.बी. रुग्ण किंवा आजार असं निदान होईल त्यांना उपचाराखाली लगेच आपण आणणार आहोत.***

अकोला जिल्ह्यातही आजपासून ते ३ जानेवारी २०२५ पर्यंत सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम राबविण्यात येणार आहे. संभाव्य क्षयरुणांची तपासणी करण्यासाठी वैद्यकीय पथके तयार करण्यात आली आहेत, या पथकांमध्ये डॉक्टर, परिचारिका, आरोग्य सेवक आणि आशा कार्यकर्त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

हवामान

विदर्भात किमान तापमानात किंचित घट जाणवत असून आज गोंदिया येथे 14.4 अंश सेलसियस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली त्या पाठोपाठ नागपूर आणि गडचिरोली येथे 14.6 इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. वर्धा इथं पंधरा अंश सेल्सिअस इतका तापमान नोंदवण्यात आलं. उर्वरित जिल्ह्यांमध्ये तापमान पंधरा ते सतरा अंश सेल्सिअस दरम्यान आहे. आगामी काही दिवस हवामान कोरडे राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या

प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केले. कमाल तापमान वाशिम येथे 31. 6°c इतका नोंदवण्यात आलं.

*****